# पतसंस्थांसाठी विविध कर



महाराष्ट्र राज्यात सहकार कायद्याप्रमाणे नोंदणीकृत सर्व सहकारी पतसंस्थांना विविध प्रकारच्या भरावयांच्या करांबाबतचे जे कायदे लागू आहेत, त्याविषयी प्रत्येक पतसंस्थेला प्रथम त्याची माहिती असणे आवश्यक आहे. व त्यानुसार त्याची नियमीतपणे न चुकता अंमलबजावणी / कार्यवाही करणेसुध्दा वैधानिकदृष्टया बंधनकारक आहे.

**अ) इन्कम टॅक्स कायदा :-**

१. प्रत्येक पतसंस्थेने फॉर्म ४९ ए मध्ये विहित नमुन्यात अर्ज करून पॅन कार्ड घ्यावे. **(कलम २ (३१))** पतसंस्थेने पॅन कार्ड न घेतल्यास रूपये १०,०००/- पर्यंत दंड भरावा लागू शकतो.

२. ज्या पतसंस्थेचे एकूण उत्पन्न (वजावटीपुर्वीचे) करपात्र मर्यादेच्या जास्त असेल तर त्या संस्थेस विविरण पत्र नमुना ७ मध्ये भरून प्रत्येक वर्षाच्या ३० सप्टेंबरपुर्वी दाखल करावे. **(कलम २७१ ब)**

३. पतसंस्थेस कोणत्याही व्यक्तीस खर्चापोटी एका दिवशी एका वेळेस रूपये २०,०००/- पेक्षा जास्त रक्कम रोख स्वरूपात देता येत नाही. **(कलम ४० (अ)३)**

४. पतसस्थेस ठेवींच्या रक्कमा एकाच नावाने एकाच वेळी एकापेक्षा अधिक दिवसात रूपये २०,०००/- पेक्षा जास्त रोख स्वरूपात स्विकारता येत नाहीत.

५. पतसंस्थेस ठेवीदारास मुदतीनंतर द्यावयाची व्याजासह रक्कम रूपये २०,०००/- ठेवींची रक्कम त्यापेक्षा अधिक असल्यास ती फक्त क्रॉस चेकने देता येईल किंवा त्यांच्या बचत खात्यात जमा करावी लागेल.

**पतसंस्थांचे उत्पन्न इन्कम टॅक्स कायद्यानुसार खालीलप्रमाणे धरले जाते.**

| **उपकलम** | **करमुक्त उत्पन्न** | **करपात्र उत्पन्न (२०१३-२०१४ व पुढे)** |
|---|---|---|
| १ (अ) | सभासदांना कर्जावरील व्याज | सभासदांकडून मिळणारे इतर उत्पन्न (व्याज उत्पन्न सोडून), घरभाडे, लॉकर भाडे, भांडवली नफा इत्यादी रू. २,००,०००/- वर असल्यास |
| २ (ड) | दुसऱ्या सहकारी संस्थेकडून मिळालेले व्याज व लाभांशाची रक्कम व्याज व लाभांश | सहकारी संस्था व्यतिरिक्त इतर बँकांकडून मिळालेले |

वरील दोन्ही तरतुदींचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते.

**ब) इन्कम टॅक्स कायद्याप्रमाणे पतसंस्थेला ''टी. डी. एस.'' खालील उत्पन्नातून कपात करावा लागतो.**

१. सेवकांचा पगार,

२. ठेव संकलकांना द्यावयाचे कमिशन,

३. जागा भाडे

४. वर्षात रू. १,८०,०००/- वा जास्त होणाऱ्या रकमांबाबत १० टक्के दराने

- वरील प्रमाणे कपात करण्यात येणाऱ्या रकमेचा भरणा पुढील महिन्याच्या ७ तारखेच्या आत करावा लागतो अन्यथा त्यावर १८ टक्के व्याज भरावे लागते.
- भरणा केलेल्या रकमांचे विवरण पत्र दर तिमाहिस ऑनलाईन पाठवावे.
- कपात केलेल्या रकमांचा दाखला **नमुना क्रमांक १६ अ व १६ ब** मध्ये द्यावा लागतो.
- आयकर खात्याकडून पतसंस्थांना त्यांच्या ठेवीदारांची समग्र माहिती पाठविण्याबाबत पत्रे आलेली आहेत. याबाबत, प्रत्येक पतसंस्थेने आपल्या आयकर तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करावी. एका विशिष्ट ठेवीदारांची माहिती मागितल्यास ती देण्याची जबाबदारी संस्थेची असते व ती देण्यास हरकत नसावी.

## कर कपातीचा चार्ट खालीलप्रमाणे :

### TDS RATE CHART

**FINANCIAL YEAR 2013-2014 : ASSESSMENT YEAR 2014-2015**

| Sec. | Nature of payments made to resident<br>Description | Threshold<br>Amount | Company Firm Co-op Soc. Local Authority Rate | Individual Huf Rate | If No PAN Or Invalid PAN Rate |
|---|---|---|---|---|---|
| 194 A | Interest - Payable by Banks | 10,000 | 10 | 10 | 20 |
| | Interest - Payable by Others | 5,000 | 10 | 10 | 20 |
| 194 B | Wining from Lotteries / Crossword Puzzle | 10,000 | 30 | 30 | 30 |
| 194 C | Payment to Contractors-Single Transaction | 30,000 | 2 | 1 | 20 |
| | Payment to Conractors-Aggregate during FY | 75,000 | 2 | 1 | 20 |
| 194 D | Insurance Commission | 20,000 | 10 | 10 | 20 |
| 194 H | Commission / Brokerage | 5,000 | 10 | 10 | 20 |
| 194 I | Rent | 1,80,000 | 10 | 10 | 20 |
| | Rent-Plant / Machinery | 1,80,000 | 2 | 2 | 20 |
| 194 J | Professional Fees | 30,000 | 10 | 10 | 20 |
| | Director's Fees | - | 10 | 10 | 20 |

**क) महाराष्ट्र राज्य व्यवसाय उद्योग, कॉलिंग्ज व एम्प्लॉयमेंट कायदा १९७५**

प्रत्येक पतसंस्थेस आपण करीत असलेल्या व्यवसायासाठी प्रमाणपत्र विक्रीकर आयुक्तांकडून घ्यावयाचे असते. प्रत्येक वर्षी व्यवसाय कर म्हणून त्यांना रू. २५००/- इतका कर भरावा लागतो. अशा कराची पाच वर्षांची एकदम रक्कम कापून घेऊन भरण्याची जबाबदारी संस्थेची आहे. प्रत्येक पतसंस्थेने **विक्रीकर आयुक्त विभागाकडून प्रथम ''ई'' नोंदणी करून घ्यावी** व प्रमाणपत्र कामाच्या जागी फ्रेम करून लावावे.

**कराची आकारणी खालीलप्रमाणे करावी:-**

| | वेतन | मासिक कराचा दर |
|---|---|---|
| अ. | रू. ५,०००/- पेक्षा जास्त नाही | काही नाही |
| ब. | रू. ५,०००/- पेक्षा जास्त पण | |
| | रू. १०,०००/- पेक्षा जास्त नाही | रू. १७५/- |

| | | |
|---|---|---|
| क. | रू. १०,०००/- पेक्षा जास्त | रू. २,५००/- वार्षिक खालीलप्रमाणे भरावेत<br>१. फेब्रुवारी माहिना सोडून बाकी ११ महिन्यांसाठी मासिक रू. २००/- प्रमाणे.<br>२. फेब्रुवारी महिन्यासाठी रू. ३००/-<br>३. पंगुत्व असलेल्या व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांना या करातून वगळण्यात आले आहे. |

**काढलेला कर जमा करण्याची मुदतः-**

पुढील महिन्याच्या ७ तारखेपर्यंत

**विवरणपत्रे दाखल करण्याबाबतः-**

विवरणपत्रे ऑनलाईन वेळोवेळी ३० तारखेपर्यंत अपलोड करावे. यासाठी पतसंस्थांनी **mahavat.gov.in** वर संपर्क करावा.

**रेकॉर्ड जतन करणेबाबत -**

संबंधित वर्षाचे रेकॉर्ड ६ वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीसाठी तर वह्या व पुस्तके १६ वर्षापर्यंत जतन करावे.

**ड) सेवाकर वित्त कायदा १९९४**

ज्या पतसंस्थांचे एकूण ढोबळ वार्षिक उत्पन्न रू. १० लाखांहून अधिक आहे, अशा संस्थांना वित्तीय कायदा १९९४ अन्वये सेंट्रल एक्साईज ऑफीसकडे **एस्.टी. १ फॉर्म ऑनलाईन नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.** अर्जासोबत पॅनकार्डची प्रत व पत्त्याचा पुरावा द्यावा लागतो. संस्था जरी विविध सेवा / एक किंवा अनेक शाखांतून प्रदान करीत असेल तरी एकच नोंदणी दाखला घ्यावा. संस्थेस ७ दिवसांत एस्.टी. -२ मध्ये दाखला मिळतो.

**सेवा कराचा दरः**

प्रत्येक सहामाही सेवाकर सहा महिन्यानंतरच्या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. समजा एप्रिल ते सप्टेंबर या सहामाहिचा कर २५ ऑक्टोबरपर्यंत निर्देशित केलेल्या बँकेत 'ऑनलाईन' भरता येतो तसेच, सहामाही विवरणपत्र **फॉर्म एस.टी. ३** मध्ये पाठवावा लागतो.

**वकिलांना फी देताना व्यवसायकर कापावा.** तसेच सिक्युरिटी गार्ड्सचे पेमेन्ट करताना ५०**%** कर कापून घ्यावा.

विविध सेवांवर ग्राहकांकडून वसूल केलेला कर व संस्थेने सेवा देणाऱ्या संस्थेला दिलेला कर यांचे नेटिंग करून येणे - देणे कर रक्कम चुकता करावा / परतावा घ्यावा.

**०१.०२.२०१२ पासून १२.३६% - यात कर १२% त्यावर + शिक्षणकर २% + उच्चशिक्षण माध्यमिक शिक्षण कर १%**

वरीलप्रमाणे पतसंस्थांनी जे विविध प्रकारचे कर भरणे / विवरण पत्र सादर करणे सर्वसाधारणपणे बंधनकारक असल्यामुळे त्यानुसार अंमलबजावणी केल्यास भविष्यात पतसंस्थांवर संबंधीत शासकीय विभागांकडून होणाऱ्या कारवाई पासून सुटका होऊ शकेल. किंबहुना पतसंस्थेस वरील करांबाबतच्या दायित्वाचे जसेच्या तसे पालन केल्यास आपोआप इतर अनुषंगिक आर्थिक बाबींवर सुपरिणाम होऊन पतसंस्था कुठल्याही अडचणी शिवाय आणखी सर्वार्थाने यश प्राप्त करु शकेल. वरील विविध करांच्या दायित्वाच्या अंमलबजावणीमुळे पतसंस्थेच्या पारदर्शकतेला आणखी उजाळा मिळू शकतो. व त्याचा परिणाम पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या कायदेशीर जबाबदारीची जाणीव होईल. जे लोक आपल्या सहकार चळवळीचा गैरफायदा घेतात, प्रसंगी पतसंस्थांतील कार्यकर्त्यांना घाबरवितात, ब्लॅकमेलींग करतात, या सर्वांपासून पतसंस्थांची सहज सुटका होऊ शकते. म्हणून ह्याही पलीकडे किंवा वरील विविध करांबाबत पतसंस्थांच्या दायित्वाबद्दल पतसंस्थांना काही अडचणी आल्या किंवा एखाद्या गोष्टीचे आणखी स्पष्टीकरण हवे असल्यास किंवा काही शंका असल्यास संबंधित पतसंस्थेने त्यांच्या इन्कम टॅक्स सल्लागाराची लेखी स्वरूपात माहिती घेवून मदत घ्यावी व त्यानुसार करील करांविषयीचे पतसंस्थांविषयीचे दायित्व पार पाडावे. यासाठी ह्या अग्रलेखात आपणास वरीलप्रमाणे उपयुक्त अशी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**